# विभाग प्रस्तावना

1. **बांधकाम विभाग हा जिल्हा परिषदे मध्ये असणा-या विभागां पैकी एक महत्वाचा विभाग आहे.** बांधकाम विभागामार्फत जिल्हा परिषदेच्या अखत्यारातील रस्ते व इमारतीची बांधकामे व देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात. त्याच बरोबर जि.प.अंतर्गत असणाऱ्या इतर विभागाकडुन प्रशासकीय मान्यता घेऊन उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या निधीतून विभागाच्या इमारतीचे बांधकामे व अस्तित्वातील इमारतीचे दुरुस्ती इ. कामे केली जातात. या करीता प्रत्येक तालुक्यात एक बांधकाम उपविभाग कार्यरत आहे. जिल्हा परिषदेतील इमारती व बांधकाम बाबत नियंत्रण व तांत्रिक सल्ला व कामांची अंमलबजावणीचे काम कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचे असते.
2. कार्यकारी अभियंता हे बांधकाम विभागाचे प्रमुख असतात व त्यांचे अधिपत्याखाली प्रत्येक तालुक्यात एक उपविभागीय अभियंता असतो. त्यांची नेमणुक शासनाच्या बांधकाम विभागाकडून केली जाते. तालुका स्तरावरील उप विभागीय कार्यालय हे कनिष्ठतम कार्यालय आहे. जिल्हा परिषद बांधकाम मार्फत केल्या जाणा-या विविध योजनांच्या बांधकामाची सर्व प्राथमिक माहिती या स्तरावर उपलब्ध होऊ शकते.
3. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागावर प्रशासकीय नियंत्रण ग्राम विकास विभागाचे असते.

## <u>जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कामे व कर्तव्ये</u>

1.जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अखत्यारातील जि.प.मालकीच्या व शासनाकडून हस्तांतरीत झालेल्या इमारतींचे बांधकामे व अस्तित्वात असलेल्या इमारतींची देखभाल दुरुस्ती करणे.

2.जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे इतर जिल्हा मार्ग व ग्रामिण मार्ग दर्जाचे रस्ते देखभाल व दुरुस्ती करीता असतात. या रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्ती करीता शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत नियतव्यय प्राप्त होतो.

3.जिल्हा परिषदेच्या इतर विभागाकडुन

उदा. 1) पशुसंवर्धन विभाग 2) समाजकल्याण 3) ग्रामपंचायत विभाग 4) कृषि विभाग 5) महिला व बाल कल्याण विभाग इ. विभागाकडे उपलब्ध होणाऱ्या निधीतुन संबंधीत विभागाने प्रशासकीय मान्यता दिलेल्या नविन इमारती, स्मशानभुमी, अंगणवाडया बांधकामे व अस्तीत्वात असलेल्या इमारतींची दुरुस्तींची कामे करणे व काम पूर्ण होताच संबंधीत विभागास हस्तांतरण करणे ही कामे प्राधान्याने केली जातात.

4. वित्त आयोग मार्फत ग्रामिण भागातील रस्ते व गावअंतर्गत रस्त्यांकरीता निधी जिल्हा परिषदेला दिला जातो.

5. जिल्हा नियोजन समितीकडील विविध लेखाशिर्षांतर्गत येणारी कामे कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून जिल्हा परिषद  बांधकाम मार्फत काम करण्यात येते.

6.जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागा मार्फत मुख्यत: करुन खालील विविध प्रकारची कामे करण्यात येतात.

7.जिल्हा परिषद अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतुन नविन रस्त्यांची , लहान पुलांची, विविध स्वरुपांच्या इमारतीची बांधकामे करणे

8.जिल्हा परिषद बांधकाम विभागा अस्तित्वात असलेल्या रस्ते, पूल, मोऱ्या इमारतींची देखभाल व दुरुस्ती करणे.

9.अतिवृष्टी सारख्या नैसर्गिक आपत्तीच्या घटनामध्ये पुर्नवसनाची कामे करणे.

10.जिल्हा परिषद विश्रामगृह आरक्षित करणे.

11.जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्त्याच्यां व इमारतींच्या बाजूस अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेणे.

## जिल्हा परिषद बांधकाम विभाग देगलूर अंतर्गत येणारे उपविभाग व तालुके

| अ.क्र. | उपविभागाचे नाव | अंतर्गत येणारे तालुके |
|---|---|---|
| १ | देगलूर | देगलूर |
| २ | मुखेड | मुखेड |
| ३ | बिलोली | बिलोली,धर्माबाद |
| ४ | नायगाव | नायगाव |